CK CK

वर्ष - ९ वे | जानेवारी - २०१२ | अंक - पहिला

# साखरसंघ वृत्त

फक्त खाजगी वितरणासाठी

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., साखर भवन, नरीमन पॉईन्ट, मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २२०४२६७६ / २२०४२९०१ / ४०६८६९०० ● ई-मेल : I) mahasugar@airtelmail.in, II) mahasugarfed@gmail.com

संपादकीय

## नियंत्रणमुक्त साखर उद्योग

मा. पंतप्रधानांनी साखर उद्योगाच्या रास्त मागण्यांमध्ये लक्ष घालून साखर उद्योग नियंत्रणमुक्त करण्यास्तव पंतप्रधानाचे आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष, (रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर) डॉ.रंगराजन यांच्या अध्यक्षतेखालील समितीची घोषणा दि.२७ जानेवारी, २०१२ रोजी केली. या समितीमध्ये वित्त विभागाचे सल्लागार डॉ. कौशिक बसू, कृषि मुल्य व लागत आयोगाचे अध्यक्ष डॉ.अशोक गुलाटी, खाद्य व कृषि विभागाचे सचिव तसेच खाद्य विभागाचे माजी सचिव श्री.नंदकुमार यांचा समावेश केला आहे. तसेच समितीस गरजेनुसार तज्ञ व्यक्तींना निमंत्रणक म्हणून घेण्याचे अधिकार देऊन अहवाल लवकरात लवकर सादर करण्यास सांगितले आहे. याबद्दलची अधिसुचना लवकरच अपेक्षित आहे. या निर्णयाचे साखर संघाने स्वागत केले आहे.

यापूर्वी साखर उद्योगाबद्दलच्या समित्या श्री.भार्गव १९७४, श्री.बी.बी.महाजन १९९८, श्री.एस.के.टुटेजा २००४, डॉ.यशवंतराव थोरात २००९ या उच्च स्तरीय समित्यांनी साखर उद्योगाचा सर्वांगीण अभ्यास करुन टप्प्या टप्प्याने साखर उद्योग नियंत्रणमुक्त करण्यास शिफारस केली होती. या वेळेस सरकार खरोखर गंभीर असल्याचे दिसून येत आहे. कारण मागील वेळेस २००२ साली संसदेमध्ये ऑक्टोबर २००३ या कालमर्यादे पर्यन्त उद्योग नियंत्रणमुक्त करण्याची घोषणा केली होती, पण ती प्रत्यक्षात आली नाही. यावेळेस सहकारी व खाजगी साखर उद्योगाने एकमुखाने याची मागणी केली आहे. समितीच्या कार्यकक्षा अद्याप जाहीर व्हायच्या आहेत.

नियंत्रणमुक्त साखर (लेव्ही पध्दत) व मासिक खुला साखर कोटा हे तर महत्वाचे मुद्दे आहेतच याबद्दल दुमत नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरीता सरकार खुल्या बाजारातून निविदा मागवून साखर खरेदी करु शकेल व सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरीता सरकार सवलत (सबसीडी) देवू शकेल.

साखर विक्री वरील नियंत्रण काढणे म्हणजे कारखान्यांना विक्रीचे पूर्ण स्वातंत्र देणे व त्यांना त्यांच्या व्यापाराचे (बाजाराचे) अंदाज बांधून किती, केव्हा व कुठे विकावे याबद्दल ठरवावे लागेल, यासाठी एखादी पध्दत निश्चित करुन विकसित करावी लागेल. यामुळे ऊस उत्पादकांना वेळेवर पैसे देता येतील. यामुळे ऊस थकबाकी ही भूतकाळामध्ये जमा होऊन ऊस उत्पादकांना तात्काळ पैसे मिळतील.

साखर उद्योग नियंत्रणमुक्त समितीला उसाचे योग्य व किफायतशीर दरा (FRP) बद्दल देखील विचार करावा लागणार आहे. ऊस उत्पादकांना सध्या योग्य व किफायतशीर दराची देशपातळीवर हमी आहे व काही राज्यांमध्ये जसे उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, तामीळनाडू येथे राज्य सरकारने ठरविलेले (SAP) ऊस दर देणे बंधनकारक आहे. भविष्यामध्ये साखरेच्या विक्रीची किंमत ही ऊस दरावर आधारित राहील, जी शासनाच्या विक्री धोरणांवर (अटी नियमांवर) आधारित असणार नाही. साखर उद्योगाच्या सशक्त वाढीकरीता ऊस उत्पादनातील नैसर्गिक व बाजारातील

CK CK

# उसाच्या भरघोस उत्पादनासाठी वापरा 'महाधन' ची दर्जेदार उत्पादने

महाधन

## बेनसल्फ

**भारतातील पहिले दाणेदार (पेस्टाईल) ९०% गंधक खत**

पिकांच्या गरजेनुसार उपलब्ध.

जमिनीतून कमीतकमी निचरा.

इतर खतांबरोबर मिसळून देण्यास उत्तम.

उसामध्ये रसाची प्रत सुधारून साखरेचे प्रमाण व उतारा वाढतो.

उसामधील बुरशीजन्य रोग प्रतिकारशक्ती वाढते.

अल्कधर्मीय, चुनखडीयुक्त व चोपण जमीन सुधारते. परिणामी उसामध्ये लोहाच्या कमतरतेमुळे पडणाऱ्या केवड्याचे नियंत्रण होऊन पीक हिरवेगार होते.

**पिकाचा दर्जा सुधारून उत्पादन वाढविते**

*एकरी प्रमाण : लागवडीच्या वेळी एकरी १५ किलो व मोठ्या बांधणीच्या वेळी एकरी २० किलो इतर खतांसोबत मिसळून द्यावे.*

**५, १० व २५ किलो पॅकिंगमध्ये उपलब्ध**

महाधन

## क्रांती

**पिकांच्या संपूर्ण वाढीसाठी सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खत**

नत्र, स्फुरद व पालाश अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढविते.

पानांमधील हरितद्रव्य निर्मितीस सहाय्य.

उसाच्या कांडीची जाडी व लांबी वाढविते.

उसामधील साखरेचे प्रमाण वाढवून कांड्यामधील पोकळपणा दूर करते.

कांडीचा आतील भाग लाल होण्यापासून बचाव करते.

**पीक व मालाचा दर्जा सुधारून उत्पादन वाढविते**

*एकरी प्रमाण : लागवडीच्या वेळी एकरी १० किलो व मोठ्या बांधणीच्या वेळी एकरी १० किलो इतर खतांसोबत मिसळून द्यावे.*

**१० व २५ किलो पॅकिंगमध्ये उपलब्ध**

**दीपक फर्टिलायझर्स अ‍ॅण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड**

गोल्फ कोर्स समोर, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे - ४११ ००६. फोन : (०२०) ६६४५ ८११२/१३

फॅक्स : (०२०) २६६८ ३७२७ इ-मेल : vbpatil@deepakfertilisers.com वेबसाईट : www.dfpcl.com

**'महाधन' - कृषि समृध्दीचे अभियान**

(देशांतर्गत/जागतिक) चढउतार यामधून मार्ग शोधावा लागेल व नियंत्रणमुक्त पध्दती यातून मार्ग काढून यशस्वी होईल असे मानले जाते. यास्तव चीन व थायलंड देशामधील सूत्राचा अभ्यासून आधार घेता येईल.

उसाचे कमी उत्पादन असणाऱ्या उत्तर प्रदेश सारख्या राज्यांना ऊस उत्पादन वाढीकरीता अधिक लक्ष पुरवावे लागेल व महाराष्ट्रासारख्या साखर उद्योगातील अग्रेसर राज्याला तामीळनाडूसारखे प्रति हेक्टर अधिक ऊस उत्पादनाचा मार्ग चोखाळावा लागेल. यामध्ये जागतिक तापमानातील वाढ व हवामानातील बदल यांचा अभ्यास करुन उपाययोजना करावी लागेल. याबद्दल उद्योगाने स्वयंस्फुर्तीने व उत्स्फुर्तपणे उपाययोजना करावी लागेल.

नियंत्रणमुक्त म्हणजे सर्व अटी-बंधने यापासून मुक्त करुन खुल्या वातावरणात व्यवसाय करणे. परंतु याच्या जोडीला उद्योगाला सध्या भेडसावणारी अडचण व आव्हाने याकडे दुर्लक्षून चालणार नाही. यामध्ये विखुरलेली गाळप क्षमता यांचे एकत्रिकरण करुन आर्थिक दृष्टया किफायतशीर बांधणी करावी लागेल. यामध्ये तांत्रिक आधुनिकता, नवीन तंत्रज्ञान, सामुहिक व सलग गट शेती प्रयोग व अंमलबजावणी, व्यापार व निर्यात धोरणे ही भविष्यातील व्यापाराकरीता महत्वाची व अभ्यासपूर्ण राहणार आहेत. आयात-निर्यात धोरण हे देखील मुक्त असणे जरुरीचे आहे व ते खुले ठेवावे लागेल. आयात-निर्याती करीता अबकारी करांचे पर्याय योजावे लागतील जेणेकरुन आयात-निर्यात ही किफायतशीर किंवा नुकसानीची या बद्दल ठरवावे लागेल. समितीला एक दीर्घकालीन दृष्टीकोन ठेऊन उद्योगातील सर्व घटकांना म्हणजेच ऊस उत्पादक, खाजगी, सार्वजनिक व सहकारी कारखाने आणि ग्राहक याबद्दल समतोल साधावा लागेल. समितीची रचना पाहून एक अत्यंत सर्वंकश धोरण ठेऊन अंतिम व सुयोग्य पर्यायांची समिती शिफारस करील अशी आशा बाळगूया !

# नियंत्रित साखर पुरवठा

राज्यातील बऱ्याच कारखान्यांकडे हंगाम २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ मधील नियंत्रित साखर शिल्लक आहे. यापैकी काही कारखान्यांनी वरील हंगामातील न उचललेल्या नियंत्रित साखरेचे खुल्या साखरेत रुपांतर करुन घेऊन ती साखर खुल्या बाजारात विकली. तथापी सदरहू हंगामातील नियंत्रित साखर देण्याचे अशा कारखान्यावर बंधन कायम ठेवूनच केंद्र शासनाने न उचललेल्या नियंत्रित साखरेचे खुल्या साखरेत रुपांतर केले असल्याने ज्यावेळी केंद्र शासन संबंधीत नियंत्रित साखरेची मागणी कारखान्याकडे करेल त्यावेळी कारखान्यांने ती देणे आवश्यक आहे.

हंगाम २०१०-११ मधील नियंत्रित साखर ५० किलोच्या ज्यूट बॅगमध्ये देणे कारखान्यावर बंधनकारक आहे. जर हंगाम २०१०-११ मधील देय असलेली नियंत्रित साखर ५० किलोच्या ज्यूट बॅगमध्ये कारखान्याकडे उपलब्ध नसल्यास कारखान्यांनी सदरहू साखरेचे रिबॅगिंग करुन ५० किलोच्या ज्यूट बॅगज्मध्ये देणे आवश्यक आहे. अथवा हंगाम २०११-१२ मधील उत्पादित साखर ५० किलोच्या ज्यूट बॅगमध्ये भरुन हंगाम २०१०-११ च्या नियंत्रित साखरेच्या दराने देणे आवश्यक आहे. तसेच हंगाम २०११-१२ अद्याप सुरु असल्याने सदरहू हंगामात देय असलेली नियंत्रित साखर ५० किलोच्या ज्यूट बॅगज्मध्ये भरुन ठेवावी म्हणजे मागणी आल्याबरोबर पुरवठा करणे शक्य होईल. अशा प्रकारे नियंत्रित साखर न पुरविणाऱ्या राज्यातील काही कारखान्यांच्या संचालक मंडळाच्या विरोधात केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाने फौजदारी खटले दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. ही बाब गांभीर्याने घेऊन कारखान्यांनी तातडीने योग्य ती वरिलप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्रीकांत सूर्यवंशी**
वणिज्य अधिकारी

# "बाजारपेठेतील आशेचा किरण"

जगातील साखरेचे उत्पादन हंगाम २०११-१२ मध्ये १७३० लाख टन अपेक्षित असून ते मागील हंगामाच्या १६३० लाख टनापेक्षा ६ टक्क्याने अधिक आहे. तर खप १६५५ लाख टनावर राहील म्हणजेच १.७ टक्क्याने वाढ होवून २५ लाख टन अधिक राहील. जगातील बाजाराच्या साखरेच्या किंमती गेल्या तीन चार महिन्यामध्ये सर्वसाधारण वर्तुळामध्ये फिरत आहेत. कारण हंगाम २०११-१२ मध्ये खपापेक्षा ८० लाख टनाने उत्पादन जास्त आहे. यामुळे वायदे बाजारामधील भविष्यातील किंमती या घटणाऱ्या असून क्वचित वाढ दर्शवितात. उत्तर गोलार्धातील ऊसाच्या चांगल्या क्षेत्रामुळे तेथे तोडणीच्या अडचणी असून, दक्षिण गोलार्धातील मुख्यत्वे जगातील दुसऱ्या नंबरचा साखर उत्पादन करणाऱ्या भारत देशाला साखर निर्यातीच्या मागणीमुळे दिलासा मिळेल. भारताप्रमाणेच थायलंड हा देखील साखर आयात करणाऱ्या देशांच्या शोधात आहे. सद्यपरिस्थितीमध्ये एप्रिलच्या मध्यान्हापर्यंत ही परिस्थिती राहील असे संकेत आहेत. त्यानंतर देखील साखरेच्या किंमतीवर दबाव राहील असे दिसते. सर्वसाधारण दोन महिन्यानंतर ब्राझील मधील ऊसाचे उत्पादन व तोडणी चित्र हे महत्वाचे ठरणार आहे. सध्या दक्षिण अमेरीकेमधील दुष्काळामुळे ब्राझील मधील ऊस पिकाच्या उत्पादनाबद्‌ल शंका निर्माण झाली आहे. इथेनॉलकरीता व साखरेकरीता किती ऊस गाळला जाईल हा महत्वाचा व गुंतागुंतीचा प्रश्न आहे.

इथेनॉलच्या किंमती साखरेपेक्षा अधिक चांगल्या राहील्या तर ब्राझीलमधील उत्पादन थोडे वाढू शकते हे गणित जागतिक साखरेच्या किंमतीवर अवलंबून रहाणार आहे.

जागतिक बाजारपेठ खरोखरच ब्राझीलच्या साखरेवर अवलंबून आहे. मे च्या सुमारास साखरेची मागणी मुस्लिम राष्ट्रातील सणांमुळे व चीन आणि मध्य पूर्वेतील मुस्लिम राष्ट्रांच्या व चीन मधील राखीव साठयांकरिता मागणी वाढण्याची शक्यता दिसून येते.

भारतातील साखरेचे पुढील हंगामात (२०१२-१३) जर घट दृष्टीक्षेपात आल्यास निर्यातीवर निर्बंध लागण्याची शक्यता आहे. अगदीच खराब परिस्थितीमध्ये भारताने साखर आयात करण्याचे ठरविले. तर जागतिक बाजारपेठेची ब्राझीलवर अधिक निर्भरता राहील व ब्राझीलला त्याचा चांगला फायदा मिळू शकेल.

जगाने ब्राझीलच्या साखर पुरवठयावर पूर्णपणे अवलंबून रहाणे असे कुणालाही परवडणारे नाही. परंतु ही परिस्थिती उद्‌भवणार नाहीच असे सांगता येणार नाही. भारतातील ऊस उत्पादनाची आकडेवारी ही एप्रिलच्या अखेरीस उपलब्ध होईल. देशातील ५० लाख हेक्टरपेक्षा अधिक ऊसाचे क्षेत्र न वाढण्याचा धोका आपण पत्करु शकत नाही. दक्षिण-पश्चिम मान्सून हे एक अनिश्चित चक्र आहे. त्यामुळे हंगाम २०१२-१३ ऊसक्षेत्र चढउतारीच्या चक्रव्युहामध्ये सापडणार का ? हा महत्वाचा मुद्दा आहे.

देशांतर्गत साखरेच्या बाजारातील कमी किंमती आणि ऊस देयकांची थकबाकी हे ऊस क्षेत्र कमी होण्यास व पुढील वर्षीच्या हंगामाबद्दल साशंकता निर्माण करु शकते. साखर उद्योग विनियंत्रण निर्णय व बाजारातील चढउतार हे सुध्दा निर्णायक ठरणार आहेत.

जागतिक अर्थव्यवस्थेतेने अपेक्षेनुसार दुसऱ्या सहामाहीत वाढ दर्शविली, ग्राहकांकरिता किंमती किफायतशीर राहील्या, बाजारपेठेतील मागणी बऱ्याप्रकारे वाढीव राहील व वर नमूद केलेल्या कारणांमुळे जगातील दोन साखरेच्या मोठया उत्पादक राष्ट्रांवर ऊस क्षेत्राबद्दलची अनिश्चितीता कायम राहील्यास किंमती वाढण्याची अपेक्षा आहे. यामुळे जागतिक साखर बाजारपेठेतील मुलभूत सुत्रांमध्ये बदल होवून पुरवठा

अधिक कठीण होईल. त्यामुळे भारतामध्ये दुसऱ्या सहामाहीत १० ते १५ टक्के किंमतीत वाढ होण्याची शक्यता दिसून येते. याची धोरण ठरविणाऱ्या उच्च पदस्थांनी नोंद घेवून सद्य परिस्थितीतील आव्हानांना तोंड देण्यास उचित पावले उचलणे क्रमप्राप्त आहे.

भारत सरकारने दि.३१ जानेवारी,२०१२ अखेर देशपातळीवर ७.६३ लाख मे.टनाचे साखर निर्यातीचे परवाने वितरीत केले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्राचे ३.३२ लाख टन (४३.५० टक्के) वाटा आहे.

तसेच दि.७ फेब्रुवारी २०१२ रोजी होणाऱ्या अधिकारप्राप्त मंत्री गटाच्या समूहाच्या बैठकीत अतिरिक्त १० लाख टन साखर निर्यातीचा निर्णय होण्याची शक्यता आहे ही एक स्वागतार्ह बाब आहे.

**अजित चौगुले**

# उसाला पहारीने खत कशा पध्दतीने द्यावे?

उसाच्या वाढीसाठी रासायनिक खतांचा कार्यक्षमपणे वापर होण्यासाठी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे प्रयोग घेण्यात आले. त्यामध्ये पहारीसारख्या अवजाराच्या साह्याने खते दिल्यास इतर पध्दतीपेक्षा अधिक ऊस उत्पादन व आर्थिक फायदा झाल्याचे दिसून आले. या पध्दतीत खतमात्रा दोन समान हप्त्यांत द्यावी लागते. पहिली खतमात्रा ऊस लावल्यानंतर दुसऱ्या पाण्याच्या अगोदर टिपऱ्यापासून १० ते १५ सें.मी. अंतरावर आणि १० ते १५ सें.मी. खोल छिद्र घेऊन उसाच्या एका बाजूस द्यावी. दोन छिद्रांमधील अंतर ३० सें.मी. ठेवावे. दुसरी मात्रा विरुध्द बाजूस त्याच पध्दतीने १३५ दिवसांनी द्यावी.

**पहारीच्या साह्याने खते देण्याच्या पध्दतीचे फायदे**

खत मुळांच्या सान्निध्यात दिले जाते, त्यामुळे ते पिकास त्वरित उपलब्ध होते. दिलेल्या रासायनिक खतांचा वातावरणाशी प्रत्यक्ष संबंध कमी येत असल्याने हवेद्वारे फार कमी प्रमाणात खतांचा ऱ्हास होतो. खत जमिनीत गाडल्यामुळे वाहून जात नाही. तणांचा प्रादुर्भाव फारच कमी दिसून येतो आणि खुरपणीवरील खर्चात ५० ते ७५ टक्के बचत होते. रासायनिक खतांची पिकांच्या गरजेनुसार हळूहळू उपलब्धता होऊन पिकाची जोमदार वाढ होते आणि भरघोस उत्पादन मिळते. सर्व ठिकाणी सारख्या प्रमाणात खत वापरणे शक्य होते, त्यामुळे सर्वत्र एकसारख्या प्रकारचे पीक येते आणि ऊस उत्पादनात



१० ते १५ टक्के वाढ होते. या पध्दतीत आपण एकावेळी एकाच बाजूने खते वापरत असल्याने, तसेच खते खोडापासून दूर असल्याने विरुध्द बाजूस उपयुक्त जिवाणू नेहमीप्रमाणे वाढत राहतात. रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढते, त्यामुळे पीकवाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत नत्र, स्फुरद व पालाश या अन्नद्रव्यांचा पुरवठा झाल्यामुळे ऊस उत्पादनात वाढ होते.

**प्रभाकर धनवटे, धुळे**
**मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र,**
**पाडेगाव, जि.सातारा**
०२१६९-२६५३३३, २६५३३५,

सौजन्य: ॲग्रोवन, ३१ जानेवारी २०१२

# संत-वचनामृत

संतचरणीं आलिंगन। ब्रह्मज्ञानी होती पावन।।
इतर सहज उध्दरती। वाचे गातां ज्याची कीर्ती।।
लाभे लाभ संतचरणीं। मोक्षमुख वंदी पायवणी।।
शरण एका जनार्दनीं। उदार संत त्रिभुवनीं।।

**-संत श्री एकनाथ महाराज**

विश्वास तो देव। म्हूण धरियेला भाव।।
माझी वदवितो वाणी। जेणें धरिली धरणी।।
जोडिलीं अक्षरें। नव्हती बुध्दीच्या विचारें।।
नाहीं केली आटी। कांहीं मानदंभासाठी।।
कोणी भाग्यवंत। तया कळे हें उचित।।
तुका म्हणे झरा। आहे मुळींचाचि खरा।।

**-संत श्री तुकाराम महाराज**

## सुविचार

जी व्यक्ती मोठ्या धैर्याने अपयशाला सामोरे जाते तीच व्यक्ती भविष्यात अद्वितीय यश मिळवू शकते.

**- रॉबर्ट केनेडी**

अपयशाचा खापर नशिबावर फोडण्यापेक्षा खडतर मेहनत करुन यशाचं शिखर गाठा

**- हेन्री गोल्डन**



# महाशिवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा!



"**साखर संघ वृत्त**" प्रत्येक महिन्याला www.mahasugarfed.org. या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.


संपादक व प्रकाशक :

**श्री. अजित चौगुले**
व्यवस्थापकीय संचालक (प्र.)

**: संपादकीय सल्लागार समिती :**

**श्री. भीमराव पां. मोरे**
उपसचिव व आर्थिक अधिकारी, मुंबई

**श्री. श्रीकांत एस. सूर्यवंशी**
वाणिज्य अधिकारी

**कु. सुषमा धुळे**
पर्यवेक्षिका

**सौ. सुचिता चाळके**
सहाय्यक



**महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि.,**
**साखर भवन, नरीमन पॉईन्ट, मुंबई - ४०० ०२१.**
दूरध्वनी : 2204 2676 / 2204 2901 / 4068 6900 । तार : "SAKARSANGH" Mumbai
ई - मेल : I) mahasugar@airtelmail.in, II) mahasugarfed@gmail.com
संकेत स्थळ (Website) www.mahasugarfed.org । फॅक्स : 2204 2578 @ 4068 6998

# FOLLOW the LEADER
# In ALCOHOL Technology

PRAJ





**W**e were the first to tropicalize continuous fermentation technology for alcohol/ ethanol production.

We were the first to introduce column internals to bring down steam consumption in distillation plant.

We were the first to introduce **'multi-feed'** distillery plant.

We were the first to install **'multi-pressure'** distillation system in India.

We were the first to introduce **'secondary cane juice** to ethanol' technology in India.

We were the first and only alcohol technology company to invest in an R&D Center dedicated to the ethanol industry.

We are the first to introduce Molecular Sieve Dehydration plants (vapor phase) in India for producing Fuel Ethanol.

We are also the first to successfully integrate cane streams for ethanol production.

And now, we are the first to demonstrate ***'Sweet Sorghum to Ethanol'*** production process at plant scale.

**PRAJ...Global leadership.. with over 450 references...**

**across 5 continents ...In more than 45 countries.**

HIFERM
FERMENTATION SYSTEMS

ECOFINE
DISTILLATION SYSTEMS

ECOMOL
Fuel Ethanol Plants

ECOVAP-FB
Flubex Evaporation

ECOMET-XT
Biomethanation System

BIOCOMP
Composting System

**PRAJ INDUSTRTIES LIMITED,**
Praj House, Bavdhan,
Pune 411 021. INDIA.
**Tel** : +91 20-22951511/22905000
**Fax**: +91-20-22951718/22951515
**E-mail** : info@praj.net
**URL** : www.praj.net

# *TELTECH* INSTRUMENTATION PVT LTD

***A Joint Venture with Alma Ingenierie, France***

An ISO 9001-2000 Certified Company


## WORLD CLASS POSITIVE DISPLACEMENT FLOW METERS IN MECHANICAL & DIGITAL READ OUT

- **Weights & Measures Approved**
- **Accuracy ±0.1% (Mech); ±0.05% (Electronic)**
- **Sizes: 1½" to 8" ● Flow: 35 to 5500 LPM**
- **Control Consumption ● Stop Pilferage**

## PRODUCT RANGE

### MECHANICAL CONFIGURATION


C35 Meter with Preset Valve for Batch Operation


Bulk Meter with Preset Valve for Batch Operation



E-type totaliser


Flow Meter Double Case



Strainer cum Air Eliminator C35


Offset Strainer cum Air-eliminator

### ELECTRONIC CONFIGURATION


Flowmeter with Pulse Transmitter


TISI Batch Controller


MICROCOMPT Batch Controller


Digital Control Valve- Diaphragm

### MASTER METERS & PROVING TANKS


Proving Tank Mobile


Master Meter

## OTHER PRODUCTS

**● Flame Arresters ● Pressure Vacuum Breather Valves**
**● Slot Dipping Devices ● Safety Valves ● Grounding Units**

**Contact - Authorised Sales Distributors & Service Franchisee**

# *MARS* Products & Services

B-Wing, Royal Sands, #301A & 306, Near Royal Classic, New Link Road
Andheri (W), Mumbai 400 053, India
Tel. : +(91) (22) 2632 2102 / 2633 1073 / 2630 1121 ● Fax : + (91) (22) 2630 0225
E-mail : marsmumbai@marsps.com / yesmars@vsnl.com
Warehouse : Navi Mumbai ● Representatives : Gujarat, Karnataka, A.P., M.P.